**महाराष्ट्र शासन**

क्रमांक :टिपीबी-४३१९/२६०/प्र.क्र.१४६/२०१९/नांव १
नगर विकास विभाग, ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक : ०६/०८/२०२०.

प्रति,
**आयुक्त**
बृहन्मुंबई महानगरपालिका.

**विषय** :- Applicability of provision 33(7)(A) & 33(7)(B) to ongoing proposal of redevelopment of existing buildings.

**संदर्भ** :- १)आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे अर्धशासकीय पत्र क्र. MCP/६२३९, दि. २२/७/२०१९.
२) शासन नगर विकास विभागाकडील सम क्रमांकाचे पत्र दि. १३/०९/२०१९.
३) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे अर्धशासकीय पत्र क्र. MCP/१६०९, दि. २७/०२/२०२०.

महोदय,

संदर्भित पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे.

आपणाकडील संदर्भ क्र.१ येथे नमूद पत्रानुषंगाने शासन नगर विकास विभागाने दि. १३/०९/२०१९ रोजीचे पत्राद्वारे आपणास स्पष्टीकरण कळविले आहे. आता संदर्भ क्र. ३ चे पत्राद्वारे आपण केलेल्या विनंतीनुसार शासन नगर विकास विभागाकडील दि. १३/९/२०१९ रोजीचे पत्र रद्द करण्यात येत असून विषयांकित प्रकरणी या पत्राद्वारे आपणास खालीलप्रमाणे सुधारीत स्पष्टीकरण विनियम ४(३) अन्वये कळविण्याबाबत मला आदेश आहेत.

बृहन्मुंबई प्रारुप विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ही कलम २६ अन्वये दि.२७/०५/२०१६ रोजी प्रसिध्द होण्यापूर्वी अथवा त्यानंतर महापालिकेस पुर्नविकासाचा प्रस्ताव सादर होऊन बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ अथवा बृहनमुंबईची प्रचलित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ नुसार महापालिकेची मंजूरी प्राप्त करुन विद्यमान इमारती तोडण्यात आल्या असतील, अशा प्रकरणी अशा इमारती दि. २७/५/२०१६ रोजी अस्तित्वात होत्या, याबाबत खातरजमा होत असल्यास तसेच बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३३(७)(A) / विनियम ३३(७)(B) मधील तरतुदीनुसार पुर्नविकास अनुज्ञेय करणेबाबतच्या इतर तरतूदींची (Except existing building) पुर्तता होत असल्यास, अशा प्रकरणी बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम ३३(७)(A) / विनियम ३३(७)(B) मध्ये रुपांतरण खालील अटी सापेक्ष अनुज्ञेय करणेस हरकत नाही.

**अट** :-

१) वरीलप्रमाणे रुपांतरणास परवानगी देण्याचे अधिकार आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना राहतील.

२) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका हे अशा रुपांतरणाला लागू करतील त्या अटींची पुर्तता करणे प्रकल्प प्रवर्तकास बंधनकारक असेल.

३) महानगरपालिकेने दिलेली विकास परवानगी ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ४८ अन्वये वैध असल्याबाबतची खात्री महानगरपालिकेने करावी.

आपला,

( निर्मलकुमार पं. चौधरी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत** :- १) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
३) निवडनस्ती (नवि-११)